# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र.रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र. ०४ /का-८,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १७/०६/२०२२.

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी
(मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

**विषय - ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२२ - प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रम**

संदर्भ -१. राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक २४/११/२०२१, दिनांक २६/११/२०२१, दिनांक २९/१२/२०२१, दिनांक २७/०१/२०२२, व दिनांक ३०/०५/२०२२ चे आदेश

२. जिल्हाधिकारी ठाणे यांचे क्र.जिकाठा/सा.शा./टे-३/ग्रा.पं./मतदार यादी/९३५, दिनांक १०/०६/२०२२ चे पत्र

महोदय,

राज्यातील ग्रामपंचायतींचे विभाजन होऊन नवनिर्मित ग्रामपंचायतींसाठी तसेच जिल्हाधिकारी ठाणे यांनी संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार ग्रामपंचायतींच्या प्रभाग रचना व आरक्षणाचा खालीलप्रमाणे **कार्यक्रम** देण्यात येत आहे.

| | प्रभाग रचना व आरक्षणाचा टप्पा | कार्यवाही पूर्ण करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|
| | **प्रारुप प्रभाग रचना तयार करणे** | |
| १ | i) तहसिलदार यांनी गुगलअर्थ चे नकाशे super impose करुन प्रत्येक गावाचे नकाशे अंतिम करणे | २४/०६/२०२२ |
| | ii) संबंधित तलाठी व ग्रामसेवक यांनी संयुक्त स्थळ पाहणी करुन प्रभाग पाडणे, सीमा निश्चित करणे व अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे आरक्षण निश्चित करणे | २८/०६/२०२२ |
| | iii) तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीने प्रारुप प्रभागरचनेची तपासणी करणे. सदर समितीमध्ये गटविकास अधिकारी व संबधित मंडळ अधिकारी यांचा समावेश असेल. | ०१/०७/२०२२ |

| | | |
|---|---|---|
| | iv) सदर समितीने प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेसाठी सादर करणे | ०४/०७/२०२२ |
| | v) जिल्हाधिकारी यांनी **नमुना ब (प्रारुप प्रभाग रचना व आरक्षण)** ची संक्षिप्त तपासणी करणे व त्यात आवश्यक असल्यास दुरुस्त्या करणे व मान्यता देणे | ०७/०७/२०२२ |
| | vi) या दुरुस्त्या अंतर्भूत करुन प्रारुप प्रभाग रचना व आरक्षणाला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीतील महिलांसह) तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीने मान्यता द्यावी व समितीच्या सर्व सदस्यांनी स्वाक्षरी करावी. | ११/०७/२०२२ |
| | vii) विशेष ग्रामसभेची सूचना देणे ( आरक्षणाची सोडत काढण्याकरीता ) | १२/०७/२०२२ |
| | viii) विशेष ग्रामसभा बोलवून, तहसिलदार यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली,प्रारुप प्रभाग रचनेवर आरक्षणाची सोडत( अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीतील महिलांसह) काढणे | १५/०७/२०२२ |
| | **प्रारुप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना मागविणे** | |
| २ | i) प्रारुप प्रभाग रचनेला ( नमुना ब) व्यापक प्रसिध्दी देऊन तहसिलदार यांनी हरकती व सूचना मागविण्यासाठी जाहिर सूचना प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक | १८/०७/२०२२ |
| | ii) प्रारुप प्रभाग रचनेवर हरकती सादर करण्याचा अंतिम दिनांक | २५/०७/२०२२ |
| | iii) प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचना सुनावणीसाठी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सादर करणे | २६/०७/२०२२ |
| | iv) प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचनांवर उपविभागीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे | ०३/०८/२०२२ |
| | v) आलेल्या प्रत्येक हरकती व सुचनांवर सुनावणीनंतर अभिप्राय नोंदवून अंतिम निर्णयासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करणे | ०८/०८/२०२२ |
| | **प्रभाग रचना अंतिम करणे** | |
| ३ | i) उपविभागीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले प्रस्ताव तपासून जिल्हाधिकारी यांनी प्रभाग रचना व आरक्षणाला अंतिम मान्यता देणे व स्वाक्षरी करणे | ११/०८/२०२२ |
| | ii) जिल्हाधिकारी यांनी मान्य केलेल्या अंतिम प्रभाग रचनेला (नमुना अ मध्ये) व्यापक प्रसिध्दी देणे | १२/०८/२०२२ |

राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूका - प्रभाग रचना व आरक्षणासाठी दिनांक २४/११/२०२१ दिनांक २९/१२/२०२१, दिनांक २७/०१/२०२२, व दिनांक ३०/०५/२०२२ च्या दिलेल्या आदेशातील सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच दिनांक ३०/०५/२०२२ आदेशासोबतच्या परिशिष्टांनुसार परिशिष्ट १ - प्रारुप अधिसूचना व परिशिष्ट २ - अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यात यावी.

सदर प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रमास व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(अविनाश सणस)
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रती -

१.प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन.

उक्त कालावधीतील ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसंदर्भात अनुदानाची पर्याप्त तरतूद (मागील अनुदानाच्या थकबाकीसह) करण्याबाबत आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही सत्वर करावी. तसेच या पत्रात निर्देश दिल्यानुसार ग्रामसेवकासह संबंधित गटविकास अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं.) जिल्हा परिषद यांची सक्रिय भूमिका व जबाबदारी राहील, याबाबतचे निर्देश देणारे पत्र आपणाकडून तातडीने निर्गमित करण्यात यावे.

२.सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांना माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी.

३.विभागीय आयुक्त (सर्व),

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व)

५.माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

६.सर्व निवडणूक कार्यासने

७.निवड नस्ती.